## आदेश अर्ज नि.क्र.०५ खाली

०१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अनुसार दाखल करुन वाद मिळकती (वादपत्रातील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद मिळकती) ति–हाईत इसमास कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये किंवा त्याची विल्हेवाट लावू नये, असा तात्पुरता मनाई आदेश या दाव्याचा निकाल होईपावेतो प्रतिवादी यांच्या विरुध्द देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र. १८ नुसार दाखल करुन अर्जास विरोध दर्शवला आहे. त्यांचे कथन की, वाद मिळकती प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या मालकी कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीशी वादीचा कोणताही हितसंबंध नव्हता व नाही. पुढे असे कथन केले की, प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास वादींना कोणताही कायदेशीर अधिकार प्राप्त नाही. प्रस्तुत अर्जा संदर्भात वादीने प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. तरी अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. उभय पक्षांचे कथन व दाखल कागदपत्रांवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले असून, त्यांचे निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादींनी प्रस्तुत अर्जासंदर्भात प्रथमदर्शनी पुरावा सादर केला आहे काय ? | ..नकारार्थी |
| २) | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | ..नकारार्थी |
| ३) | अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | ..नकारार्थी |
| ४) | कोणता आदेश ? | ..अर्ज नामंजूर करण्यात आला. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.१ ते ४ करीताः–**

०४. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्याची चर्चा एकत्रीत करण्यात येत आहे. वादी क्र.१ याने प्रस्तुत अर्जातील कथनांच्या पृष्ठयर्थ स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे. वादींच्या कथनानुसार उत्तमराव गायकवाड व लिलाबाई गायकवाड यांच्या विवाह संबंधातून त्यांचा जन्म झाला आहे. वादींनी त्यांच्या कथनाच्या पृष्टयर्थ कौटुंबिक पुरवठा पत्रीका / शिधापत्रीका ची प्रत दाखल केली आहे. सदर शिधापत्रीकेत कुटुंब प्रमुख म्हणून उत्तमराव गायकवाड, त्यांची पत्नी म्हणून लिलाबाई गायकवाड आणि मुलांच्या रकान्यात वादी क्र.१ ते ३ यांच्या नावाची नोंद आहे. प्रतिवादींनी वरील वस्तुस्थिती पूर्णपणे नाकारलेली आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार उत्तमराव गायकवाड यांनी लिलाबाई गायकवाड हिचा त्याग करुन दुसरा विवाह केला होता आणि दुस–या पत्नीपासून वादी क्र.१ ते ३ यांचा जन्म झालेला आहे. पुढे वादींनी असे कथन केले की, वादपत्रातील परिच्छेद क्रमांक ०२ मध्ये नमूद जमिनी व घर मिळकत त्यांची आई लिलाबाई गायकवाड हिच्या मालकी कब्जे वहिवाटीची होती आणि लिलाबाई गायकवाड ही दिनांक १५.११.२०२० रोजी मयत झाल्यानंतर वारसा हक्काने सदर जमिनी व घर मिळकती वादी क्र.१ ते ३ यांच्या मालकीचे झालेले आहे. वाद जमिनी व घर मिळकत लिलाबाई गायकवाड हिच्या स्वकष्टार्जित मालकी कब्जे वहिवाटीची असल्याबाबतची वस्तुस्थिती प्रतिवादींनी नाकारलेली नाही. प्रतिवादींनी त्यांच्या कथनाच्या पृष्टयर्थ दिनांक १५.०७.२००५ रोजीच्या मृत्यूपत्राचा दस्त दाखल केला आहे. सदर मृत्यूपत्र दस्तातील मजकूराचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येत आहे की, वाद जमिनी व घर मिळकत लिलाबाई गायकवाड हिच्या स्वकष्टार्जित मिळकती असून तिला अपत्य जन्माला आलेले नव्हते. पुढे असेही दिसून येते की, उत्तमराव गायकवाड यांनी

लिलाबाई गायकवाड हिचा त्याग करुन दुसरा विवाह करुन घेतला होता. सदर मृत्यूपत्राच्या आधारे लिलाबाई गायकवाड यांनी तिच्या नावे असलेली वर नमूद जमीन व घर मिळकत तिची बहिण शकुंतला म्हणजेच प्रतिवादी क्र.२ हिच्या नावे केली आहे. पुढे न्यायालयासमोर असाही पुरावा आला आहे की, सदर मृत्यूपत्र दस्ताच्या आधारे वाद मिळकतीपैकी काही मिळकत प्रतिवादी क्र.२ हिने हस्तांतर केले आहे.

०५. प्रतिवादी पक्षाने दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की वाद जमिनी व घर मिळकती प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या कब्जे वहिवाटीत आहे. लिलाबाई गायकवाड ही वादींची जन्मदात्री आई असल्याबाबतचा प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. सबब, वादी पक्षाने प्रस्तुत अर्जासंदर्भात प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज वादींच्या मागणीनुसार मंजूर होण्यास पात्र नाही. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.४ करीताचे निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.०५ नामंजूर करण्यात आला.

२. खर्चाबाबत हुकूम नाही.

SHAIKH ABDULKARIM A

Digitally signed by SHAIKH ABDULKARIM A
Date: 2022.12.05 12:14:16 +0530

**(अ.अ.शेख)**
**दिवाणी न्यायाधीश**
**व.स्तर, मेहकर.**

**दिनांक:–०३/१२/२०२२.**

I A.N.Vyawhare, Stenographer (Grade II ) affirm that, contents of the PDF files are same words for words as per original.

Date of Judgment / order : 03.12.2022
Date of Uploading : 05.12.2022